## गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य :

**१) शिष्यवृत्तीचे नाव** : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा यांमध्ये गुणवान यादीत वरच्या क्रमांकाने उच्च स्थान मिळविणा-या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य देण्याची योजना.

'गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य'

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा यामध्ये वरचा क्रमांक मिळविणा-या गुणवान विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तेस आर्थिक अडचणीमुळे बाधा पोहोचू नये म्हणून आणि त्यांची गुणवत्ता वाढविणे शक्य व्हावे व त्यायोगे त्यांच्या बुध्दिमत्तेचा फायदा समाजास व राज्यास करून घेता यावा, या उद्देशाने अशा विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य देण्याची योजना **शासन निर्णय क्र. एफईडी/१०८३/१८१६३५/[२३१७]/ साशि-५, दि. १७ मे, १९८४ अन्वये** दरवर्षी मार्च /एप्रिलमध्ये होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षांमध्ये वरचा क्रमांक मिळविणा-य़ा गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य देण्याची योजना **सन १९८४-८५ च्या शैक्षणिक** वर्षापासून कार्यान्वित करण्यात आली.

सदर शिष्यवृत्ती ही गुणवत्तेच्या (विहित संघाच्या आधीन राहून) निकषाच्या आधारे शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. संबंधित अभ्यासक्रमाकरिता शासनाने विहित केलेले दरानुसार संबंधित गुणवान यादीमध्ये वरच्या क्रमांकाने उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना १०० % अर्थसहाय वरिष्ठ / व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दिले जाते.

१) गुणवान विद्यार्थ्यांची निवड व पात्रता : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, मुंबई, नाशिक, कोल्हापूर, लातूर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या आठ विभागातील परीक्षेत गुणवान विद्यार्थ्यांची प्रतिवर्षी पुढीलप्रमाणे निवड करण्यात येते :

१) माध्यमिक स्तर :

| | |
|---|---|
| १) सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधून पहिले | ५ |
| २) गुणवत्तेनुसार पहिल्या तीन मुली | ३ |
| ३) गुणवत्तेनुसार मागासवर्गीयातील विद्यार्थ्यांमधून पहिले तीन विद्यार्थी, प्रत्येक विभागातून | ३ |
| **एकूण** | **११** |
| आठ विभागांतून मंडळातील विद्य़ार्थ्यांची एकूण संख्या | ८८ |

२) उच्च माध्यमिक स्तर :

| | |
|---|---|
| १) सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधून पहिले पाच | ५ |
| २) गुणवत्तेनुसार पहिल्या दोन मुली | २ |
| ३) मागासवर्गीयांमधून पहिले दोन विद्यार्थी | २ |

४) विज्ञान, कला व वाणिज्य शाखेतून प्रत्येकी दोन ६
विद्यार्थी असे एकूण सहा विद्यार्थी.
प्रत्येक विभागातून एकूण १५

आठ विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या १२०

शासन निर्णय दि. २५ एप्रिल, २००० अन्वये समान गुणांचे कमीतकमी पाच विद्यार्थी असल्यास किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी असल्यास त्यांचीही निवड करण्यात येते.

३) शिष्यवृत्तीचा दर : शासनमान्य व अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये मान्य दराने आकारल्या जाणा-या सर्व फीची प्रतिपूर्ती केली जाते. यात प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क, ग्रंथालय शुल्क, प्रयोग शुल्क, जिमखाना शुल्क, सत्र शुल्क, परीक्षा शुल्क, वसतिगृह शुल्क याचा समावेश आहे.

१) वसतिगृहात प्रवेश घेतल्यास वसतिगृह फी
प्रत्येक सत्रासाठी - रु. ३०० /-
२) भोजन खर्च दरमहा (सर्व विद्यार्थ्यांसाठी) - रु. १५० /-
३) वैद्यकीय खर्च किंवा वार्षिक खर्च - रु. १२० /-
यापैंकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम

४) पुस्तके, वह्या व इतर शैक्षणिक साहित्य यांसाठी साहाय्य पुढे दर्शविल्याप्रमाणे :

| | अभ्यासक्रम | वार्षिक फी रक्कम |
|---|---|---|
| १) | कनिष्ठ महाविद्यालये- ११वी/१२वी | रु. ३०० /- |
| २) | महाविद्यालये [ज्ञान व्यतिरिक्त] कला, वाणिज्य | रु. ५०० /- |
| ३) | विज्ञान, शेतकी, पशुवैद्यकीय महाविद्यालये | रु. ७०० /- |
| ४) | पदविका अभ्यासक्रम | रु. ५०० /- |
| ५) | वैद्यकीय/अभियांत्रिकी महाविद्यालये. | रु. १०,०००/- |

**४) या योजनेचा लाभ मिळण्यासाठी तसेच दरवर्षी पुढे चालू ठेवण्यासाठी विहित केलेले नियम**:

१) या योजनेखाली मिळणा-या मदतीस पात्र होण्यासाठी पालकांच्या उत्पन्नाची अट नाही.

२) विद्यार्थ्याने जो अभ्यासक्रम घेतला असेल, तो त्याने किमान त्या अभ्यासक्रमाच्या पदवी /पदविका पर्यंत पूर्ण केला पाहिजे /मध्येच अभ्यासक्रम सोडून दिल्यास पूर्वी दिलेली रक्कम त्यांचेकडून /पालकाकडून वसूल करण्यात येईल.

३) एकदा निवडलेला अभ्यासक्रम बदल करावयाचा असल्यास त्यासाठी विद्यार्थ्याने शिक्षण संचालकांची पूर्व-संमती घेणे आवश्यक आहे . **पूर्व-परवानगी शिवाय अभ्यासक्रमात बदल केल्यास या योजनेखाली मिळणारे अर्थसाहाय्य बंद होईल.**

४) एका अभ्यासक्रमासाठी ज्या कालावधीसाठी मदत मिळाली आहे, तेवढ्या कालावधीसाठी पूर्व-परवानगीने बदल केल्यास या योजनेखाली मिळणारी मदत मिळणार नाही.

५) विविध शुल्कांची [फीची] प्रतिपूर्ती शासनाने किंवा संबंधित विद्यापीठाने मान्य केलेल्या दरानुसार केली जाईल.

६) या योजनेचा लाभ घेत असताना विद्यार्थ्याला केंद्र अथवा **राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा अथवा सवलतीचा**लाभ घेता येणार नाही. **मात्र मागासवर्गीयांच्या बाबतीत ही अट लागू नाही.** त्यांना केंद्र /राज्य शासनाच्या शिष्यवृत्या /सवलतीनुसार शिक्षण फी किंवा परीक्षा फी, सत्र फी, जिमखाना फी, प्रयोग, प्रवेश ग्रंथालय फी मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी या योजनेखाली घेवू नये.

७) मंजूर झालेली मदत अटींची पूर्तता केल्यास पुढे चालू राहील.

अ)विद्यार्थ्याने कमीत कमी विज्ञान शाखेत ७०% व कला, वाणिज्य शाखेत कमीत कमी ६० % गुण प्राप्त केले पाहिजेत व पुढील वर्गात प्रवेश घेतला पाहिजे.

ब) वर नमूद केलेली सवलत फक्त एका अभ्यासक्रमासाठी फक्त एकदाच मिळू शकेल.

क) विद्यार्थ्याने वर्तन, प्रगती समाधानकारक पाहिजे.

ड) एका संस्थेतून दुस-या संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी शिक्षण संचालकांची पूर्व-परवानगी घेतली पाहिजे.

५) **अर्ज कोठे मिळतो:** शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], शिष्यवृत्ती शाखा, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे- ४११००१ येथे मिळतो.

६) अर्ज कोणामार्फत कोणाच्या नांवे पाठवावयाचा : राज्यातील महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठाचे कुलसचिव /शासकीय/अशासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये अधिष्ठाता, मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता, यांचेमार्फत शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], यांचेकडे सदर आवेदनपत्रे सादर करावीत.

७) अर्ज स्वीकृतिचा अंतिम दिनांक : शिक्षण संचालक [उच्च शिक्षण] यांचेकडे सदर अर्ज, आवेदनपत्र ३० सप्टेंबर पर्यंत पोहोचविण्याबाबत प्रत्येक वर्षी परिपत्रक निर्गमित केले जाते.

८) नवीन मंजुरी/नूतनीकरणाची कार्यवाही शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], यांचेमार्फतच केली जाते. ती वरील नियमांनुसार केली जाते.